# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक क्र. सीटीएयु/ १८ /२०२०–२०२१

संदर्भ:–१) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./४८/२००९ दिनांक ३१ जानेवारी २००९
२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./७३/२०१० दिनांक १६ एप्रिल, २०१०
३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./५५/२०११ दिनांक १० मार्च, २०११
४) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./९५/२०११ दिनांक ३० मे, २०११
५) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७७/२०११ दिनांक ८ नोव्हेंबर २०११
६) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./०१/२०१२ दिनांक २१ जानेवारी, २०१२
७) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१२/२०१२ दिनांक २८ मे, २०१२
८) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७/२०१२ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३
९) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१५/२०१४–२०१५ दिनांक १५/०९/२०१४
१०) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./८/२०१५–२०१६ दिनांक ०५/१२/२०१५.
११) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/०४/२०१६–२०१७ दिनांक २८/११/२०१६.
१२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/१०/२०१८–२०१९ दिनांक ०९/०१/२०१९.
१३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/०६/२०१९–२०२० दिनांक १९/०६/२०१९.

**विषय:– संलग्नित महाविद्यालयांत नियमित प्राचार्य नियुक्तीबाबत.**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत मानव्य विद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आंतर विद्याशाखा या विद्याशाखांमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ संचालक व संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात प्राचार्यांची पदे प्राधान्याने भरावीत असे विद्यापीठामार्फत उपरोक्त परिपत्रके निर्गमित करुन वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

शासन परिपत्रक क्र. संकिर्ण–२०१७/प्रक्र.१७०/मशि–५ दिनांक २३ एप्रिल, २०१८ अन्वये अशासकीय अनुदानीत महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली पदे तसेच प्राचार्य पदाचा पाच वर्षाचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी प्राचार्यांची पदे भरण्यासाठी शासनाकडून मान्यता देण्यात आली होती. मात्र तरीही अनेक महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य पदाची भरती प्रक्रिया न करता, प्रभारी प्राचार्यांच्या नियुक्तीचे प्रस्ताव मान्यतेसाठी विद्यापीठाकडे पाठविले जात आहेत. अशा महाविद्यालयांना वरिल शासन निर्णयानुसार संबंधित सहसंचालकांकडून प्राचार्य पद भरतीकरिता नाहरकत प्रमाणपत्र उपलब्ध करून नियमित प्राचार्यपद भरतीसाठी विहित पद्धतीने प्रस्ताव सादर करण्याकरिता उपरोक्त परिपत्रकामार्फत वारंवार निर्देश देऊन कळविण्यात आले होते.

मात्र तदनंतरही अनेक महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य भरतीसाठी प्रक्रिया सुरू केलेली नाही. ज्या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पदावर प्रभारी म्हणून काम पहात आहेत अशा महाविद्यालयांचे प्रभारी प्राचार्यांच्या स्वाक्षरीने आलेले कोणतेही कागदपत्रे/प्रस्ताव/दस्तऐवज स्वीकारले जाणार नाहीत अशा सुचना व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ च्या चर्चेच्या अनुषंगाने मा. सदस्यानी केल्या आहेत.

शासन निर्णय अर्थसंकल्प/२०२०/प्र.क्र.६५/अर्थ—३ दिनांक ०४/०५/२०२० अन्वये राज्यातील नियमित प्राचार्य भरतीवर कोविड १९ संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव उद्भवलयाने निर्बंध लादण्यात आलेले होते. तदनंतर शासन परिपत्रक क्र. संकीर्ण.२०१७/प्र.क्र.१७०/मशि ५ दिनांक ८ जानेवारी, २०२१ अन्वये सदर निर्बंधातून सुट देण्यात आलेली आहे.तसेच सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या अनुषंगाने उपरोक्त सुचनेची नोंद घेऊन अशासकिय अनुदानित महाविद्यालयांच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सहसंचालकांकडून प्राचार्य पद भरतीकरिता ना—हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून नियमित प्राचार्य पद भरतीसाठी यथोचित कार्यवाही करावी त्याचप्रमाणे विनाअनुदानित महाविद्यालयांनीही नियमित प्राचार्य भरण्यासाठी यथोचित कार्यवाही त्वरीत करावी, अन्यथा दिनांक २७/०९/२०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील बाब क्र. ११ मधील ठरावानुसार कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त कार्यवाही प्राधान्य क्रमाने करावी, अन्यथा उपस्थित होणाऱ्या अडचणींची जबाबदारी संपूर्णपणे महाविद्यालयांची असेल याची नोंद घ्यावी, ही विनंती.

दूरध्वनी क्र. ०२२—६८३२००५०
ईमेलआयडी — concolsection@gmail.com

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— 6.3.2021

( डॉ. बळीराम गायकवाड)
प्र. कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत मानव्य विद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आंतर विद्याशाखा या विद्याशाखांमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा.मुख्य सचिव, वित विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२

२. मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२,

३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — १.

४. मा. सह संचालक, महापालिका मार्ग, मुंबई विभाग, मुंबई — ४०० ००१.

५. मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.

६. मा. प्र. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.

७. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.

८. वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२

९. सचिव, मुंबई विद्यापीठ कॉलेज प्राचार्य असोसिएशन, प्रगती महाविद्यालय, डोंबिवली — ४२१ २०१.

१०. डॉ. टी. ए. शिवरे, अध्यक्ष, A.M.G.C. Director, विल्सन महाविद्यालय, चौपाटी, मुंबई —४०० ००७.

११. सचिव, बुक्टो (BUCTU), विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

१२. मुप्ता (MUPTA) संघटना, १०३, गोराई, सम्राट अशोक को. हाऊ. सोसायटी, प्लॉट नं. १०२, गोराई—२, बोरिवली (पश्चिम), मुंबई — ४०० ०९१.

१३. मा. अध्यक्ष (UMASA),समाजशास्त्र विभाग, रानडे भवन, कलिना, मुंबई — ४०० ०९८.

१४. मा. अध्यक्ष (MUCTA),खोली नं ४७, रानडे भवन, कलिना, मुंबई — ४०० ०९८.

१५. मा. अध्यक्ष (MUST), १००१/बी—१, विहंग गार्डन, रेमंड कंपनी समोर, वर्तक नगर, ठाणे (प),— ४०० ६०६..

१६. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).